**कृपया प्रसिद्धीसाठी** **13 ऑक्टोबर 2011**

## राम नाईक यांना 'मराठी-द्वेष्टा' म्हटल्याबद्दल
## मनसेच्या शिरीष पारकरांची न्यायालयात बिनशर्त माफी

**मुंबई, गुरुवार :** भाजपा नेते राम नाईक यांना 'मराठी-द्वेष्टा' म्हटल्याबद्दल मनसेचे सरचिटणीस श्री. शिरीष पारकर यांनी आज न्यायालयात बिनशर्त माफी मागितली. श्री. पारकर यांनी श्री. राम नाईक यांना मराठी-द्वेष्टा म्हणून बदनामी केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध श्री. नाईक यांनी दाखल केलेला अब्रुनुकसानीचा खटला महानगर दंडाधिकारी न्यायालय क्र. 17 च्या न्यायाधिश श्रीमती सुरेखा अभय सिन्हा यांनी निकालात काढला. ॲड. जयप्रकाश मिश्रा यांनी श्री. नाईक यांची बाजू मांडली.

विधानसभा निवडणुकांच्यावेळी 1 ऑक्टोबर 2009 रोजी 'आयबीएन लोकमत' वर श्री. निखील वागळे यांच्या 'आजचा सवाल' कार्यक्रमामध्ये श्री. पारकर यांनी भाजपा नेते श्री. राम नाईक यांच्यावर व्यक्तिगत टीकास्त्र सोडले. यावेळी ''श्री. राम नाईक हे मराठी-द्वेष्टे आहेत'' असा निखालस खोडसळपणाचा आरोप श्री. पारकर यांनी केला. एवढेच नव्हे तर ''श्री. राम नाईक कर्करोगाने आजारी आहेत. दर तीन महिन्यांनी त्यांचे रक्त बदलावे लागते'', असे तद्दन खोटे विधान यावेळी श्री. पारकर यांनी केले. या वक्तव्यामुळे आपली बदनामी झाली असून तात्काळ माफी मागावी अन्यथा न्यायालयात दावा लावण्याचा ईशारा श्री. नाईक यांनी श्री. पारकर यांना लगेचच दुस-या दिवशी दिला. परंतु बेमुर्वतखोरपणे श्री. पारकर यांनी त्याकडे साफ कानाडोळा केला. त्यामुळे श्री. नाईक यांनी अब्रुनुकसानीसाठी न्यायालयात अर्ज दाखल केला. अब्रुनुकसानीचा खटला गेले वर्षभर न्यायालयात सुरु होता. या खटल्याच्या आतापर्यंत दहा सुनावण्या झाल्या परंतु त्यापैकी आजचा अपवाद वगळता एकाही सुनावणीसाठी श्री. पारकर न्यायालयात हजरही राहिले नाहीत. अखेर 15 सप्टेंबर रोजी झालेल्या मागील सुनावणीच्यावेळी श्री. पारकर यांचे वकील ॲड. शिवाजी चौगुले यांनी श्री. पारकर पुढील सुनावणीस हजर राहातील असे आश्वासन दिले.

आजच्या सुनावणीच्या शेवटी श्री. शिरीष पारकर यांनी श्री. राम नाईक यांना मराठी-द्वेष्टा म्हटल्याबद्दल बिनशर्त माफी मागितली. एवढेच नव्हे तर त्यांच्या आजाराबाबत खोटी वक्तव्ये केल्याबद्दलही लेखी दिलगिरी व्यक्त केली आहे. त्यामुळे अब्रुनुकसानीचा खटला मागे घेण्यास हरकत नसल्याचे श्री. नाईक यांनी न्यायालयास सांगितले.

''श्रीकृष्णाने भगवद् गीतेत म्हटल्यानुसार सज्जनाला अपकीर्ति ही मरणापेक्षा अधिक दुःखदायक वाटते म्हणूनच केवळ आपण हा खटला दाखल केला होता. श्री. पारकर यांनी क्षमा मागितल्याने मी खटला मागे घेतला आहे'', अशी प्रतिक्रिया यावेळी श्री. राम नाईक यांनी दिली.

**(कार्यालय सचिव)**